# Online Learning Resources Centre: विशेष संदर्भ ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक

पुरुषोत्तम प्रल्हाद कावळे
संजय शामराव भूतमवार

**सार :-**

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जेव्हा सर्वच स्तरातून आणि विशेषतः कोविड सारख्या परिस्थितीपासून शासन स्तरावरून online शिक्षण, online अध्ययन आणि अध्यापनावर भर दिला जात आहे तेव्हा सर्वच शिक्षण संस्थांच्या ग्रंथालायातूनही हा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयांना Online Learning Resources Centre मध्ये transform करणे आवश्यक असतांना ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी त्यांच्या सभासदांना Online Learning Resources Centre स्वरुपात सेवा उपलब्ध करून देण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचे अध्ययन प्रस्तुत शोध निबंधात केले आहे.

**शोध संज्ञा:-** Learning Resources, website, archive, e-content, consortium, google drive, youtub, repository, Remote Access

**प्रस्तावना :-**

ग्रंथालयांनी त्यांच्या उदयापासूनच त्यांच्याकडे संग्रहित ज्ञानाच्या माध्यमातून मानव समाजाची सेवा केली आहे. मानव समाजाच्या विकासाबरोबर मनुष्याची माहिती बाबतची किंवा माहिती मिळविण्याची संकल्पना बदलत गेली त्याच बरोबर ग्रंथालायांनीही स्वतः मध्ये बदल करून नवी स्थित्यंतरे स्वीकारून मनुष्याच्या माहिती बद्दलच्या आकांक्षा पूर्ण केल्या आहेत.

आधी वाचक ग्रंथालयात संग्रहित ज्ञान ग्रंथ स्वरुपात मागणी करीत असे. मात्र समाजात झालेल्या संगणक आणि इंटरनेट तंत्रज्ञानाच्या अंतर्भावाने व माहिती संग्रहणाच्या अद्ययावत आभासीय संसाधानामुळे आणि माहितीची अतिउच्च उपयोगीता व आवश्यकतेमुळे उपयोक्ता आता ज्ञानाची मागणी त्यांच्या स्रोताच्या आणि आभासीय database स्वरुपात करीत आहेत. त्यामुळे ग्रंथालायातूनही पारंपरिक ज्ञान संग्रहण साधनांबरोबरच इंटरनेट, आधुनिक संगणक आणि माहिती तंत्रज्ञान संसाधनांचा अंतर्भाव

करून उपभोक्त्यांना सेवा पुरविल्याजात आहेत आणि म्हणून आज ग्रंथालयांना ज्ञान स्रोत केंद्र असे संबोधण्यात येते.

आजच्या तरुण पिढीने प्लेग, सार्स, इतर साथीचे रोग ज्यामुळे संपूर्ण मानव समाज धोक्यात येईल असे रोग इतिहासात वाचले होते. मात्र २०२० मध्ये आलेला कोरोना (कोविड १९) हे स्वतः अनुभवले आहे. कोरोना मुळे संपूर्ण जग थांबले होते, घरात बंदिस्त झाले होते, मात्र याही परिस्थितीत अध्ययन आणि अध्यापन सुरू रहावे याकरिता शासन स्तरावर अध्ययन आणि अध्यापन online पद्धतीने सुरू करण्याचा निर्णय घेतला. पण online अध्ययन आणि अध्यापनाकरिता पाठ्यपुस्तक पाठ्यक्रमाशी निगडीत आवश्यक वाचन साहित्य, विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्गाला तातडीने उपलब्ध करून देणे सहज शक्य नव्हते.

इंटरनेटच्या जाळ्यात विविध विषयाशी निगडीत वाचन साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. मात्र ते उपलब्ध करून घेण्यात बऱ्याच अडचणी आहेत. विषयाशी निगडीत योग्य साहित्य शोधण्यात बराच वेळ, आणि श्रम खर्ची करावे लागते. त्यातही कोविड ची परिस्थिती अचानक उद्भवल्यामुळे कुणीही या परिस्थितीशी सामना करण्यास तयार नव्हते, मात्र ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी त्यांच्या उपयोक्त्यांना, सभासद वाचक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना त्यांच्या विषयाशी निगडीत वाचन साहित्य online उपलब्ध करून देऊन Online Learning Resources Centreची संकल्पना मूर्त स्वरुपात साकार केली आहे.

**संशोधनाचे उद्देश:-**

१) ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी त्यांच्या उपयोक्त्यांना Online Learning Resources उपलब्ध करून दिलेले आहे का ते पाहणे.

२) ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी उपलब्ध करून दिलेले Online Learning Resources त्यांच्या उपयोक्त्यांना online दूरस्थ ठिकाणाहून (Out of IP) प्राप्त/ उपलब्ध होत आहे का ते पाहणे.

३) ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी उपलब्ध करून दिलेल्या Online Learning Resources सेवाची माहिती इतरांपर्यंत पोहचविणे.

**संशोधन पद्धती**

सादर संशोधन कार्यात ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांच्या केवळ website/ webpage चे अध्ययन करण्यात येणार असल्याने या संशोधनात webometrics संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी त्यांच्या उपयोक्त्यांना, सभासद वाचक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना त्यांच्या विषयाशी निगडीत वाचन साहित्य online घर बसल्या उपलब्ध करून देण्यासाठी पुढील संसाधनांचा वापर करुन Online Learning Resources Centre ची संकल्पना पुढील प्रमाणे साध्य केली.

**website:-**

ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांची स्वतंत्र website नसल्यामुळे केंद्राने विद्यापीठाच्या website वर KRC च्या नावाचे webpage तयार केले आणि या page वर वाचकांना उपयोगी पडतील मात्र इंटरनेटच्या महाजालात वेळेवर शोधणे कठीण जाईल अशा विविध ओपेन सोर्स स्रोतांच्या link एकत्रित व्यवस्थित उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे अभ्यासकांनी त्या link इतरत्र शोधण्यात जाणारा वेळ, श्रम आणि data ची बचत होते. अशाप्रकारे e-journal & books, World e-books, NDL, e-thesis अशा विविध उपयोगी sources link इतरत्र शोधण्यात वेळ व data खर्च न करता KRC च्या webpage वर जाऊन दिलेल्या sources link मधून हवी असलेली माहिती online हवे तेव्हा, असल्या ठिकाणी शोधण्याची व्यवस्था KRC ने आपल्या उपयोक्त्यांना करून दिली आहे. [1]

**इंटरनेट archive:-**

archive हि एक इंटरनेट महाजालात मोफत स्वरुपात चालविले जाणारी ग्रंथालय सेवा/ व्यवस्था आहे ज्यात कुणीही स्वतःचे खाते उघडू शकतो आणि तयार खात्यावर आपले विविध साहित्य संग्रहित करू शकतो व हवे असेल तेव्हा इंटरनेट जोडणीच्या माध्यमातून कधीही कुठेही पुनर्प्राप्त करू शकतो. [2]

ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी इंटरनेट archive वर स्वतः चे खाते उघडून विद्यापीठाच्या प्रकाशन विभागातून प्रकाशित होणारी सर्व महत्त्वपूर्ण प्रकाशाने आणि ज्ञान स्रोत केंद्रात उपलब्ध तीन हजार च्या वर प्राचीन हस्तलिखिते

डिझीटाइज करून संशोधकांना कोणतेही शुल्क न आकारता पूर्णपणे मोफत online download करण्याची सोय उपयोक्त्यांना करून दिली आहे. [3]

**Youtube Channel:-**

ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक ने youtube सारख्या social networking site वर आपले Channel तयार केले आहे. ह्या youtube Channel वर विद्यापीठातील नामवंत प्राध्यापकांनी त्यांची विषयाशी निगडीत अभ्यासक्रमांवर तयार केलेले विडीओ uplode करून अभ्यासक्रमावर विडीओ Repository तयार केली आहे. हे अभ्यासक्रमावरिल विडीओ त्या Channel च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात शिकत असल्याचा अनुभव या विडीओ वरून घेता येईल. [4]

**Google drive:-**

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात search आणि इतर सेवा पुराविणारे google हे खूप मोठे नाव आहे जे त्यांच्या site वर mail account असलेल्या प्रत्येक खात्याला mail drive वर १५ gb पर्यंत संग्रहण सुविधा निशुल्क पुरविते. [5]

KRC ने आपल्या उपयोक्त्यांना Online Learning Resources ची सेवा उपलब्ध करून देण्यासाठी google drive या गुगलच्या सेवेचाही पुरेपूर वापर केला आहे. KRC ने विद्यापीठाच्या आधी झालेल्या परीक्षांचे पेपर सेट विद्यार्थ्यांना online उपलब्ध करून देण्यासाठी drive वर संग्रहित करून त्याची link KRC च्या वेब page ला दिली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना पेपर सेट चे घरबसल्या अवलोकन करणे सहज शक्य झाले आहे. [6]

**Consortium:-**

ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक ने infilibnet सोबत MOU केलेला आहे आणि या MOU च्या माध्यमातून केंद्राला Economic weekly, ISID, J-Gate, J-stor, SouthAsia Archive, Springerlink, Tylor & Francis अशा आंतरराष्ट्रीय नामवंत नियतकालिकांचे user ID password च्या माध्यमातून सभासदत्व मिळालेले आहे. ह्या सर्व नियतकालिकांच्या weblink ची ग्रंथालय केंद्राने KRC च्या वेब page वर link दिली आहे. या माध्यमातून सर्व नियतकालिके २४ तास संशोधक वाचकांना उपलब्ध करून दिलेले आहेत. त्यामुळे केंद्रातील विद्यार्थी, संशोधक वाचकांना त्यांच्या विषयात सातत्याने

update होणारी माहिती Full text download करण्याजोग्या स्वरुपात मिळू शकेल ती ही पूर्णपणे मोफत. [7]

**e-content programme:-**

ज्ञान स्रोत केंद्राने e-content programme या नावाने नावीन्यपूर्ण उपक्रम तयार केला असून त्यां अंतर्गत विद्यापीठात चालविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांचे/ विषयांचे/ पाठ्यक्रमाच्या open sources वर उपलब्ध असलेल्या link त्या-त्या पाठ्यक्रमातील content समोर त्याची link देऊन जवळपास सर्वच अभ्यासक्रमाच्या links विद्यार्थ्यांना एकत्रित online पुरविण्याची सोय ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक ने वेब page link या माध्यमातून केली आहे. [8]

**Repository/ संग्रहिका:-**

कुणालाही आपली repository तयार करता येते त्यासाठी D-spece किंवा Greenstone या सारखे विविध softwer मोफत आणि paide अशा स्वरुपात उपलब्ध आहेत. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी आपली repository तयार करण्यासाठी D-spece आज्ञावलीचा पर्याय निवडला आहे आणि यामाध्यमातून केंद्राने खालील प्रमाणे विविध repository तयार केल्या आहेत. [9]

**1) Book Repository:-**

या संग्रहीकेत केंद्राने विद्यापीठाच्या प्रकाशन विभागातून प्रकाशित होणारे आणि विद्यापीठाचा copyright असलेले सर्व ग्रंथ डिजिटल स्वरुपात वाचकांकरिता online उपलब्ध केलेले आहेत.

**2) Faculty Publications:-**

केंद्राने या माध्यमातून विद्यापीठात कार्यरत सर्व प्राध्यापकांची प्रकाशने मग ते त्यांचे ग्रंथ असो वा त्यांचे विविध नियतकालिकातून प्रकाशित झालेले शोधनिबंध ते सर्व त्या-त्या प्राध्यापकांच्या नावासमोर उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे संशोधक, विद्यार्थ्यांना व्यक्तिविशेष चे साहित्य त्यांच्याच नावाखाली एकत्रित online उपलब्ध होत आहेत.

**3) कालिदास Repository:-**

या संग्रहिकेच्या माध्यमातून open sources वर उपलब्ध असलेले कालिदासाचे आणि कालिदासावरचे साहित्य संग्रहित करून वाचकांना कालिदास repository च्या

माध्यमातून online उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांच्या मार्फत केला जात आहे.

**4) KKSU Journals repository:-**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातून "शोधसहिता" हे UGC Carelist मध्ये समाविष्ट नियतकालिक नियमित प्रकाशित होत असून या नियतकालिकाचे सर्व खंड PDF स्वरुपात repository आणि archive वर संग्रहित करून संशोधक, प्राध्यापक वाचकांना online उपलब्ध करून दिले आहेत.

**5) ODL Book repository:-**

या repository च्या माध्यमातून विद्यापीठाच्या online दुरस्थ शिक्षाकेंद्राच्या माध्यमाने चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाशी निगडीत विद्यापीठातून प्रकाशित सर्व पाठ्यक्रम PDF स्वरुपात

online मोफत उपलब्ध करून दिले जात आहेत.

**6) Research Project Repository:-**

विद्यापीठातून चालविल्या जाणाऱ्या शोधप्रकल्पाशी निगडीत प्रकाशनांना Research Project Repository यात स्थान देण्यात आले असून ते सर्वांसाठी online खुले ठेवलेले आहे, जेणेकरून कुणीही संशोधक, प्राध्यापक, वाचक त्याचे अवलोकन करू शकेल.

**7) Thesis Repository:-**

या संग्रहिकेच्या माध्यमातून सदर विद्यापीठातून आचार्य पदवी (Ph.D) प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे शोधगंगा पोर्टल वर upload केलेले शोध प्रबंध e-thesis link च्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे संशोधक विद्यार्थ्यांना इतरत्र न भटकता आपल्या सोईनुसार विद्यापीठाचे सर्व शोधप्रबंध online उपलब्ध करून घेता येतात.

उपरोक्त सर्व स्रोत उपयोक्त्यांना इंटरनेटच्या माध्यमातून घरपोच मिळविता यावे याकरिता ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक केंद्राने Informatics या संस्थेकडून remote access हि सेवा उपलब्ध करून घेतली आहे.

**Remote Access:-**

ह्या प्रणाली बाबत माहिती तंत्रज्ञानाच्या भाषेत सांगायचे झाल्यास Remote Access ह्या प्रणाली च्या माध्यमातून संगणकावर IP base सुरू असलेले programme/ सेवा out of IP म्हणजे दूरस्थ ठिकाणाहून (Remotly) online मिळविता (Access)

येतात. [10] सादर प्रणाली ज्ञान स्रोत केंद्राने उपलब्ध करून त्यांच्या ग्रंथालय webpage वरील उपर्युक्त सर्व सेवा उपयोक्त्याच्या दालनात व्यवस्थित उपलब्ध करून देण्याचे कार्य केले आहे. Remote Access हि प्रणाली वरील सर्व sources एकत्रित आणून एकाच user ID व password च्या उपयोगाने त्यांच्या सेवेत प्रवेश मिळविण्यास सहाय्य करते. त्यामुळे उपयोक्त्यांना उपरोक्त सेवांकरिता प्रत्यक्ष ग्रथालयात न येता इंटरनेट जोडणीच्या माध्यमातून कोणत्याही ठिकाणाहून सेवा प्राप्त करता येतील अशी सोय ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी आपल्या उपयोक्त्यांना करून दिली आहे. [11]

**निष्कर्ष:-**

१) ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक यांनी त्यांच्या उपयोक्त्यांना मोठ्या प्रमाणात Online Learning Resources उपलब्ध करून दिलेले आहेत.

२) Remote Access प्रणाली स्वीकारल्यामुळे online सेवा केवळ संस्थेंतर्गतच नाही तर बाहेरून दूरस्थ ठिकाणाहून देखील ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक च्या सेवा प्राप्त होत आहेत.

३) सदर अध्ययानातून ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ज्ञान स्रोत केंद्र, रामटेक एक Online Learning Resources Centre म्हणून कार्य करीत असल्याचे निदर्शनास येते.

**References**

[1] K. K. S. University, "https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371," 9 6 2022. [Online]. Available: https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371.

[2] प. कावळे आणि स. भूतमवार, “ग्रामीण महाविद्यालय : डिजिटल ग्रंथालय आणि रिमोट एक्सेस,” *शोधसंहिता,* भाग IX, क्र. I, p. ५८ , जानेवारी 2022.

[3] K. K. S. University, "https://archive.org/details/@kavikulaguru_kalidas_sanskrit_university_library," 09 06 2022. [Online]. Available: https://archive.org/details/@kavikulaguru_kalidas_sanskrit_university_library.

[4] K. K. S. University, "https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1300," 09 06 2022. [Online]. Available:

https://www.youtube.com/channel/UCqkW1zfJ52bn8e3VQU0-ZvA?view_as=subscriber.

[5] google.com, "https://www.google.com/search?q=about+google+drive&rlz=1C1CHZN_enIN917IN917&oq=ABOUT+Google+drive&aqs=chrome.0.0i512l3j0i22i30l7.18216j0j7&sourceid=chrome&ie=UTF-8," 09 06 2022. [Online]. Available: https://www.google.com/search?q=about+google+drive&rlz=1C1CHZN_enIN917IN917&oq=ABOUT+Google+drive&aqs=chrome.0.0i512l3j0i22i30l7.18216j0j7&sourceid=chrome&ie=UTF-8.

[6] k. k. S. University, "http://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1177," 09 06 2022. [Online]. Available: https://drive.google.com/drive/folders/0BzUsPV2G_-kYT21Renl0NWo1MFk.

[7] K. K. S. Univesity, "https://kksanskrituni.digitaluniversity.ac/WebFiles/10%20-%20E-%20Journals.pdf," 09 06 2022. [Online]. Available: https://kksanskrituni.digitaluniversity.ac/WebFiles/10%20-%20E-%20Journals.pdf.

[8] K. K. S. University, "https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371," 09 06 2022. [Online]. Available: https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1405.

[9] K. K. S. University, "https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371," 09 06 2022. [Online]. Available: https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371.

[10] प. कावळे and स. भूतमवार, "ग्रामीण महाविद्यालये :डिजिटल ग्रंथालय आणि रिमोट एक्सेस," *शोधसंहिता,* vol. IX, no. I, p. ५८, जानेवारी २०२२.

[11] K. K. S. University, "https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371," 09 06 2022. [Online]. Available: https://kksanskrituni.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=29371.